


सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेयरच्या वितरणप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी मदत

## तज्ज्ञांचे मार्गदर्शन : मुकुल माधव फाउंडेशनचा उपक्रम

**पुणे :** सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सर्वंकष आधार पुरविण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाउंडेशन साताऱ्यातील रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्लाकेंद्र उघडणार आहे. येथे या मुलांना दूर-पुनर्वसन कार्यक्रमाचे लाभ घेता येतील. तसेच, केईएम रुग्णालय, पुणे येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मिळविता येईल.

बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञांसारख्या तज्ज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी घोषणा मुकुल माधव फाउंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी केली.

सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेयरच्या वितरणप्रसंगी त्या बोलत होत्या.

या प्रसंगी साताऱ्याचे जिल्हाधिकारी अश्विन मुदगल, सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्याम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक फारोख कूपर आणि कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि.चे सीईओ झाल कूपर, रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. परवेज ग्रांट आणि केईएम हॉस्पिटलच्या भारती पाटील आदी या वेळी उपस्थित होते.

(वा. प्र.)